| MHKO070013922016 | **रे.क.नं.२५०/२०१६** |
|---|---|
| | रमेश नामदेव कांबळे आणि इतर<br>विरुध्द<br>अमोल यशवंत कांबळे आणि इतर |

नि.क्र.५२ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादी क्र.३ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेस परवानगी मिळणेविषयी दाखल केलेला आहे.

०२. वादी यांनी त्यांचे अर्जात असे कथन केले आहे की, यातील प्रतिवादी क्र.३ लहू बापू कांबळे हे दि.०६/०५/२०२२ रोजी मयत झाले आहेत. त्यांना अर्जात नमुद प्रमाणे सरळ व कायदेशीर वारस आहेत. सबब, अर्ज मंजूर करणेविषयी विनंती वादी यांनी केलेली आहे.

०३. विरुध्द बाजूने प्रतिवादी क्र.१ तर्फे त्यांचे म्हणणे देवुन कथन करण्यात आलेले आहे की, अर्जामधील सर्व कथने खोटी व चुकीची आहेत. वादी यांना प्रतिवादी यांचे मृत्यूबाबत माहिती नसलेचे विधान चुकीचे आहे. वादी व प्रतिवादी हे नात्यामधील असलेने मृत्यू बाबतची माहिती वादीना होती. मात्र जाणीवपुर्वक वादीनी वारस रेकॉर्डवरती घेतले नाहीत. तसेच विलंब माफीच्या अर्जातील कथने देखील चुकीची आहेत. त्यामुळे वादीचा सदरचा अर्ज रद्द होणेस पात्र आहे. तथापि मे. कोर्ट सदरचा अर्ज मंजुर करण्याच्या निर्णयापावेतो आलेस वादींना रु.३०००/– कॉस्ट करणेत यावी अशी विनंती केली आहे.

०४. उभयपक्षाच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादीने प्रस्तुतचा दावा हा हक्कज्ञापन आणि कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. दावा हा स्थावर मिळकतीबाबत आहे. वादीतर्फे नि.क्र.४९ ला प्रतिवादी क्र.३ लहू बापू कांबळे यांचे मृत्यू प्रमाणपत्र दाखल केले आहे. प्रतिवादी क्र.३ चे वारस म्हणून त्यांना दावा चालविणेचा अधिकार असलेने

दावेत त्यांना तांत्रीकदृष्टया मयत प्रतिवादी क्र.३ च्या समोर रेकॉर्डवर घेणे न्यायाचे हेतुस्तव आवश्यक आहे. प्रस्तुतचा दावा हा गुणदोषावर निकाली निघणे हे अत्यंत आवश्यक आहे. वादीतर्फे नि.क्र.५० व ५१ ला अनुक्रमे प्रतिवादी क्र.३ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी झालेला विलंब माफ होवुन मिळणेसाठी व प्रतिवादी क्र.३ यांचेविरुध्द झालेला तांत्रीकदृष्टया अबेटमेंटचा आदेश रद्द होवुन मिळणेकामी अर्ज दाखल केलेले आहेत. नि.क्र.५१ वरील अर्ज हा खर्चासह मंजुर करणेत आलेला आहे. त्यामुळे अर्जातील कथन व कारण पाहता प्रस्तुतचा अर्ज हा मंजुर होण्यास पात्र आहे. करिता खालील आदेश पारीत करण्यात येतो–

– **आदेश** –

१. प्रस्तुतचा अर्ज (निशाणी क्र.५२) हा नि.क्र.५१ वरील खर्चाची पुर्तता झाल्यास मंजुर समजण्यात यावा.

२. नि.क्र.५० व नि.क्र.५१ वरील आदेश या आदेशासोबत वाचण्यात यावा.

३. दोन्ही पक्षांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE

Digitally signed by AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Date: 2026.01.08 17:44:38 +0530

दि.०८/०१/२०२६
जयसिंगपूर.

**(अ. त्रिं. मनगिरे)**
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
जयसिंगपूर ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Sou. P. S. Musale |
| Name of Court | Jt.C.J.J.D.& J.M.F.C., Jaysingpur. |
| Date of Dictation. | 08/01/2026. |
| Judgment/order signed by the PO on | 08/01/2026. |
| Judgment/order uploaded on | 08/01/2026. |